10-03-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 03/09/2025 11:43 PM Page 1

खाणपिटातील पाणी शेतीसाठी

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत : देशातील पहिला प्रकल्प : सुर्ला येथील प्रकल्पाचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. ९ : खाण पिठातील पाणी शेतीसाठी उपयोगात आणण्याच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्पिंकलर व इतर माध्यमातून स्वयंचलित पद्धतीने हे पाणी शेतीसाठी उपलब्ध करण्याची देशातील ही पहिलीच योजना पूर्णपणे सफल झाली असून देशासाठी हा प्रकल्प आदर्श ठरेल सुटला गावातील शेतकऱ्यांनी पाणी वाटप सोसायटीच्या मार्फत योग्य पद्धतीने सर्व शेतकऱ्यांना पाणीपुरवठा करून आदर्श पाणी वाटप संस्था म्हणून लवकर प्राप्त करावा, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सोडला येथे केले.

सूर्ला साखळी येथे जलसंपदा खात्यातर्फे चार कोटी खर्चून खाणपिटातील पाणी शेतीला पुरवणाऱ्या या प्रणालीमध्ये स्वयंचलित पद्धतीचा अवलंब केलेला असून त्याचे उद्घाटन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते करण्यात आले.

सुर्ला : प्रकलपाचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. बाजूला प्रमोद बदामी, सरपंच, पच, अधिकारी, शेतकरी व ग्रामस्थ.

यावेळी मुख्य अभियंता प्रमोद बदामी, शैलेश पोकळे, नरेश पोकळे, विनोद भंडारी, किशोर भावे, कालिदास बर्वे सूर्य, सरपंच साहिमा गावडे, सुभाष फोडेकर, विश्रांती सुलकर, भोला खोडगिनकर, दिनेश मकईकर, सुचिता गावकर, शानू सुरलीकर, फिनोलेक्स कंपनीचे अधिकारी शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

देशातील पहिला प्रकल्प

सूर्ला गावात देशातील हा पहिला स्वयंचलित जलसिंचन प्रकल्प असून त्याचा योग्य पद्धतीने वापर करताना या ठिकाणी या तीन पाणी यावाटप संस्था निर्माण करण्यात आला आहे त्यांनी याची योग्य निगा राखावी तसेच ही संस्था नफ्यात येईल यासाठी प्रयत्न करताना शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाचा साज चढवत पडीक जमीन ओलिताखाली आणून हरितक्रांतीचा ध्यास तसेच दवलक्रांतीचा ध्यास पूर्ण करावा, असे आवाहन डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.

स्वयंपूर्ण गोवा आत्मनिर्भर गोवा हा आमचा संकल्प आहे प्रत्येक गावात मोठ्या प्रमाणात वडिलोपार्जित शेती आहे ते वनिता खाते आणण्यासाठी अशा प्रकारचे प्रकल्प वरदान ठरतील शेतकऱ्यांनी योग्य पद्धतीने पाणी वाटप करून घेऊन शेती ओलिताखाली आणावी व आपला उत्कर्ष साधावा असे आवाहन त्यांनी केले जलसंपदा खात्याचे त्यांनी विशेष अभिनंदन केले. सिंचन प्रणालीचा प्रति हेक्टर खर्च ८,६०,९७० रुपये आहे आणि तो प्रति थेंब अधिक पिकाच्या राष्ट्रीय जल अभियानानुसार आहे.

स्वयंचलित सिंचन प्रणाली पाण्याचा वापर ४०७ पर्यंत कमी करते, ज्याचा वापर अधिक जमीन सिंचनासाठी केला जाऊ शकतो. तीन वर्षांच्या कालावधीसाठी पुरवठादार फिनोलेक्स मार्फत कंत्राटदाराद्वारे ही प्रणाली चालविली जाईल आणि त्याची देखभाल केली जाईल. त्यानंतर ती विभागाकडे सोपवली जाईल. आधुनिक वैज्ञानिक पद्धतीने उपलब्ध पाण्याचा इष्टतम वापर करून सुमारे ४५ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे.

गावातील शेतकऱ्यांनी स्वयंचलित सिंचन प्रणाली चालविण्यासाठी आणि व्यवस्थापित करण्यासाठी पाणी वाटप असोसिएशनची स्थापना केली आहे.

कडचल आणि सुर्ला गावात अजून पाणी वाटप सोसायटी निर्माण होतील. सूर्ला येथील मुख्य खाण पिटातील पाणी खालच्या पिटात आणून त्याठिकाणी स्वयंचलित यंत्रणा मोटर्स बसवले असून फिनोलेक्स कंपनी तर्फे आधुनिक तंत्र वापरून एक प्रोग्राम सेट केला आहे त्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्प्रिंकलर्स मार्फत शेतीला पाणी मिळेल. व तंत्र वापरून सर्व शेतकऱ्यांसाठी आळी पळी ने सिंचन व्यवस्था उपलब्ध होणार आहे त्यामुळे हा प्रकल्प वरदान ठरेलं अशी माहिती देण्यात आली. मुख्य अभियंता प्रमोद बदामी यांनी या आधुनिक सिंचन योजना प्रकल्पची माहिती दिली. सरपंच व पंचायत मंडळ तसेच ग्रामस्थानी मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांचे विशेष अभिनंदन केले.

पान १ वरून

टीडीपी खासदाराची वादग्रस्त घोषणा

असल्याचे स्पष्ट केले. याआधी महिला पोलिसांना सहा महिन्यांची प्रसूती रजा फक्त दोन प्रसूतींसाठी मिळत होती. मात्र, नव्या निर्णयानुसार सर्व महिला कर्मचाऱ्यांना कितीही अपत्ये असली तरी पूर्णकालीन प्रसूती रजा देण्यात येईल. या नव्या धोरणांवर आणि अप्पलनायडू यांच्या वक्तव्यावर राज्यभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, याचा सामाजिक आणि राजकीय परिणाम काय होईल, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

गोव्यातील नद्यांचे प्रदूषण गंभीर!

प्राधिकरण आणि मोरमुगाव बंदर प्राधिकरण यांना अधिक अधिकार प्राप्त झाले आहेत. परिणामी, स्थानिक मासेमार समुदायांवर कायदेशीर संकुचितता लादली जात आहे. मांडवी नदीतील पारंपरिक मासेमारीला जलक्रीडा उद्योगाचा मोठा फटका बसला आहे. बोटींमधून निर्माण होणाऱ्या तीव्र आवाजामुळे मासे नदीतून दूर पळत आहेत. यासोबतच कॅसिनोंच्या प्रभावामुळेही स्थानिक मच्छीमारांचे नुकसान झाले आहे. म्हणूनच, मासेमारीसाठी महत्त्वाच्या नद्यांना संरक्षण देण्याची मागणी त्यांनी केली. रॉड्रिग्ज यांनी भारतातील मासेमारांना कायदेशीर मान्यता मिळावी आणि त्यांचे हक्क संरक्षित करण्यासाठी ठोस कायदे तयार करावेत, अशी मागणी केली. सरकारी योजना प्रत्यक्ष लाभार्थी समुदायांच्या सल्लामसलतीशिवाय आखल्या जातात आणि त्यामुळे त्या अपयशी ठरतात, असे त्यांनी स्पष्ट केले. भविष्यात कोणत्याही धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत मासेमार समुदायांचा सक्रिय सहभाग असावा, अशी शिफारस त्यांनी केले.

शिक्षण संचालकांच्या विधानांवर आक्षेप

पूर्ण झाले होते. त्यामुळे एप्रिलमध्ये शाळा सुरू करण्याचा निर्णय का घेतला जात आहे, याचे स्पष्ट कारण अद्याप देण्यात आलेले नाही.
रॉड्रिग्ज यांनी सीबीएसई अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत नमूद केलेले लाभ, आवश्यक सुविधा आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांशिवाय आम्हाला सीबीएसई स्वरूप लादले जात आहे. त्यामुळे पालक प्रचंड असंतुष्ट आहेत, असे त्यांनी नमूद केले.

बलराम निवासी विद्यालयात महिलादिनानिमित्ताने विविध कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. ९ : आमोणे, पैंगीण येथील बलराम निवासी विद्यालयात आज रोजी, जागतिक महिला दिन विविध कार्यक्रमांनिशी साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून पैंगीण ग्रामपंचायतीच्या सरपंच तथा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सविता तवडकर, ज्येष्ठ शिक्षिका वंदना गावकर, फ्रिडा बार्रेटो उपस्थित होत्या. सौ. तवडकर यांनी सांगितले की, आज महिला चूल आणि मूल यापुरत्याच सीमित न रहाता त्यांनी विविध कार्यक्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. समाजासाठी महत्वपूर्ण योगदान दिलेल्या महिलांचा आदर्श आजच्या पिढीने घ्यावा, असे सांगितले.

या दिनाचे औचित्य साधून विद्यालयात शिक्षिकांसाठी पौष्टिक आणि रुचकर खाद्यपदार्थ तयार करणे, हेअर स्टाईल, मेहंदी घालणे अशा स्पर्धा आयोजित केल्या होत्या. शिक्षिकांनी उत्स्फूर्तपणे यांत भाग घेतला. सुरवातीला विद्यार्थ्यांनी महिलांच्या कार्यावर फॅशन शो सादर केला. सूत्रसंचालन सान्वी वेळीप हिने, तर फ्रिडा बार्रेटो यांनी आभार मानले.

तळवाडा सरकारी विद्यालयात पारंपरिक वस्तूंचे प्रदर्शन

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ९ : केरी तळवाडा येथील सरकारी प्राथमिक विद्यालयात विज्ञान दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. त्यानिमित्त पारंपरिक वस्तूंचे प्रदर्शन आयोजित केले होते.

यावेळी व्यासपीठावर न्यू इंग्लिश हायस्कूलचे मुख्याध्यापक भावार्थ मांद्रेकर, केरी – तेरेखोल जैवविविधता समितीचे अध्यक्ष महेंद्र नार्वेकर, शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या गाड, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दत्ताराम नाईक, पालक शिक्षक संघ अध्यक्षा सोहनी तळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

केरी : सरकारी प्राथमिक विद्यालयात विज्ञान दिवस कार्यक्रमात बोलताना मुख्याध्यापक भावार्थ मांद्रेकर. सोबत सोहनी तळकर, दर्शना नाईक, मुख्याध्यापिका विद्या गाड, दत्ताराम नाईक व इतर.

यावेळी मुलांना विज्ञान दिनाचे महत्त्व समजावले व भारताचा वैज्ञानिक इतिहास जाणून घेऊन त्यापासून प्रेरणा घेण्याचे आवाहन मुख्याध्यापक भावार्थ मांद्रेकर यांनी केले.

विज्ञान दिनानिमित्ताने पालकांच्या सहकार्याने शाळेतर्फे पारंपरिक वस्तूंचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. मुलांनी या प्रदर्शनात स्वयंपाकघर, शेतीकाम, बांबूच्या वस्तू, जुन्या इलेक्ट्रॉनिक वस्तू, जुनी अवजारे इत्यादी वस्तू पाहिल्या व त्यांची माहिती घेतली. शाळेच्या या उपक्रमाचे सर्व उपस्थितांनी कौतुक केले व शाळा राबवित असलेल्या अशा ज्ञान पूरक उपक्रमाबद्दल प्रशंसा केली.

यावेळी इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रयोग प्रदर्शन भरवले होते. तर पूर्वप्राथमिक, इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी टाकाऊतून टिकाऊ वस्तूंचे प्रदर्शन भरवले होते. यावेळी पालक वर्ग मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी बहुसंख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक रविराज पेडणेकर व शिक्षिका दिलेशा तळकर यांनी तर शिक्षिका अश्विनी गडेकर यांनी आभार प्रदर्शन केले.

'औषधी रासायनशास्त्रातील नैसर्गिक पदार्थ' विद्याप्रसारक विद्यालयात व्याख्यान

मोरजी : डॉ. दीपेश हरमलकर यांचा गौरव करताना गणेश शेटगावकर व मुख्याध्यापक दिलीप मेथर .

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. ५ : विद्याप्रसारक विद्यालय मोरजी येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त गोवा सरकारच्या 'विज्ञान धारा २०२५' या कार्यक्रमाअंतर्गत 'औषधी रासायनशास्त्रातील नैसर्गिक पदार्थ' या विषयावर सरकारी महाविद्यालय साखळीचे विज्ञान विषयाचे प्राध्यापक डॉ. दीपेश सखाराम हरमलकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी व्यासपीठावर विद्याप्रसारक समाजाचे अध्यक्ष गणेश शेटगावकर तसेच शाळेचे मुख्याध्यापक दिलीप मेथर उपस्थित होते.

आयुर्वेद हा विषय आपल्या भारतासाठी किंवा आम्हा भारतीयांसाठी नवीन नसून पुरातन काळापासून आम्ही भारतीय विविध नैसर्गिक घटकांचा वापर औषधाच्या रूपाने नियमितपणे करत असतो. आयुर्वेद हे आपल्या स्वयंपाक घरातूनच सुरू होत असून आम्हा सर्वांचे पूर्वज याचाच वापर करून सुदृढ आयुष्य जगत होते. आजच्या बदलत्या काळात आपल्या पूर्वजांनी दिलेला ज्या आयुर्वेदाचा ठेवा आपण विसरत चालला आहोत त्याचीच ओळख करून देणारे व्याख्यान विद्याप्रसारक विद्यालयात घेण्यात आली. यावेळी डॉ. दीपेश सखाराम हरमलकर यांनी आपल्या स्वयंपाक घरातील वेगवेगळ्या पदार्थांमध्ये कोणते रसायनिक घटक उपस्थित असतात आणि त्यांचा वापर आयुर्वेदात कशाप्रकारे केला जातो याचे स्पष्टीकरण मुलांना दिले. त्यांनी मुलांना विविध प्रश्न विचारू त्यांच्याकडून विज्ञानावर आधारित उत्तर घेतली. डॉ. दीपेश यांनी विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाची मुलांनी अचूक उत्तरे देत विज्ञानातील आणि आयुर्वेदातील आपल्या ज्ञानाचे प्रदर्शन केले. विद्याप्रसारक समाजाचे अध्यक्ष गणेश शेटगावकर हे स्वतः एक रसायनशास्त्रज्ञ असल्याने त्यांनी स्वतःचे अनुभव याप्रसंगी व्यक्त करत मुलांना विज्ञान क्षेत्रात काम करण्यासाठी प्रेरित केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका कुमारी हर्षा नाईक यांनी केले. प्रमुख वक्त्यांची ओळख मुख्याध्यापक दिलीप मेथर यांनी केली. तर शिक्षिका मंजिरी शेटगावकर यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

गुढीपाडव्यानिमित्त मांद्रेत सार्वजनिक गुढीपूजन, दुचाकी फेरी

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ९ : मांद्रे नववर्ष स्वागत समितीतर्फे गुढीपाडव्याच्या निमित्ताने रविवार दि. ३० मार्च रोजी श्री भगवती सप्तेश्वर मंदिराच्या प्रांगणात सार्वजनिक गुढीपूजन आणि भव्य दुचाकी फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवामध्ये हजारोंच्या संख्येने लोकांची उपस्थिती राहणार असल्याचा निर्धार समितीच्या बैठकीत व्यक्त करण्यात आला.जिल्हा परिषद हॉल येथे अध्यक्ष मुकुंद कायसुकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या संख्येने झालेल्या या बैठकीत संयोजक महेश गोडकर यांनी गुढीपाडव्याचे महत्त्व विशद केले. त्यांनी सांगितले की, संस्काराची गुढी मांद्रे गावात उभारण्याचे समितीचे ध्येय असून, सर्व पदाधिकारी तन–मन–धनपूर्वक प्रयत्न करीत

आहेत.समिती सचिव संजय नाईक यांनी मागील बैठकीचा इतिवृत्तांत सादर करत विविध विषयांवर चर्चा केली. खजिनदार परेश सावंत यांनी आर्थिक विषयांवर प्रकाश टाकला तर उपाध्यक्ष प्रसाद शहापूरकर यांनी निमंत्रण पत्रकाबाबत सूचना मांडल्या.उत्सवाच्या तयारीसाठी विविध प्रमुख नेमण्यात आले आहेत. गुढी पूजन व्यवस्था प्रमुख म्हणून दिनेश मयेकर, ढोल ताशा प्रमुख संतोष बर्डे, आतशबाजी प्रमुख रवी गोवेकर, सजावट व्यवस्था प्रमुख दीपेश हरमलकर, स्वागत कमानी प्रमुख प्रवीण किनळेकर, प्रसाद आणि अल्पआहार व्यवस्था प्रमुख म्हणून राजेश व मनोज हडफडकर यांची निवड करण्यात आली. बैठकीत सुभाष पार्सेकर, मंगेश नाईक, केशव मांद्रेकर, विजय नागवेकर, गौरेश कोरगावकर आणि इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

सरकारी विद्यालय धडा मेळावली येथे 'बाजार दिवस' साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

गुळेली, दि. ९ : सरकारी प्राथमिक विद्यालय धडा मेळावली सत्तरी येथे बाजार दिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गुळेली सरकारी माध्यमिक विद्यालयाच्या विज्ञान शिक्षिका अपर्णा सावईकर, गुळेली शाळेचे शारीरिक शिक्षक अनिध्य पोकळे, सरकारी प्राथमिक विद्यालय धडा या शाळेचे माजी अध्यक्ष प्रशांत नाईक, बालवाडीच्या सेविका श्वेता नाईक, विद्यालयाचे मुख्याध्यापक गोकुळदास पिर्णकर आदी कार्यक्रमाला उपस्थित होते.

शिक्षिका सावईकर म्हणाल्या की, 'बाजार दिवस' प्रत्येक शाळेत साजरा केला पाहिजे त्यामुळे मुलांमध्ये बाजारात जाऊन किंवा

धडा मेळावली : 'बाजार दिवस'चे उद्घटन करताना अपर्णा सावईकर. सोबत दिनेश नाईक, प्रशांत नाईक, अनिध्य पोकळे, दीपाली पर्येकर व गोकुळदास पिर्णकर.

दुकानात जाऊन दुकानदारांबरोबर एखादी वस्तू अशी विकत घेतली जाते याची माहिती कळते, देवाण घेवाण कशी करावी याची माहिती मिळते. गणित चोख होण्यास मदत मिळते, असे त्या म्हणाल्या.

सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक गोकुळदास पिरणकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन शाळेची शिक्षिका दीपाली पर्येकर हिने केले. कार्यक्रमाला पालक व गावची मंडळी उपस्थित होती. मुलांनी आणलेल्या विविध वस्तू त्यांनी यावेळी खरेदी केल्या.

मराठी भाषा निमित्त आयोजित खास कार्यक्रमात डॉ. बिभिषण सातपुते, लक्ष्मी जोग, डॉ. अनीता तिळवे, यांच्यासह साहित्यिक.

महिलांचे सर्वच क्षेत्रात मोठे योगदान

सुलक्षणा सावंत डिचोलीत महिला क्रीडा मेळाव्याला मोठा प्रतिसाद

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. ९ : आजची महिला आधुनिक युगात अनेक क्षेत्रात पादाक्रांत करीत असून ग्रामीण भागातही महिला विविध क्षेत्रात अग्रेसर होताना दिसतात. आरोग्य, नातेसंबंध करियर आणि स्वावलंबन याबाबतीत योग्य समन्वय साधत महिलांना उंच भरारी घेण्यासाठी सहकार्याची समन्वयाची भूमिका महत्त्वाची असून त्यातूनच स्त्री शक्ती उत्तुंग यश प्राप्त करेल, असे असल्याचे प्रतिपादन भाजप नेत्या सुलक्षणा प्रमोद सावंत यांनी डिचोली येथे केले.

शिक्षा व्हिजन डिचोली भारतीय

डिचोली : क्रीडा मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी सुलक्षणा सावंत, डॉ. चंद्रकांत शेट्ये, नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, वल्लभ साळकर, राजेश पाटणेकर, नगरसेवक सरपंच व मान्यवर.

जनता पार्टी डिचोली मंडळातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त डिचोली मतदारसंघ मर्यादित महिला क्रीडा मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे या नात्याने त्या बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, डॉ. गीता कडकडे, काकोडे नगराध्यक्ष विजय कुमार नाटेकर, माजी सभापती राजेश पाटणेकर, वल्लभ साळकर, डॉ. कौस्तुभ पाटणेकर महिला अध्यक्ष शर्मिला पळ, नगरसेवक सरपंच पंचायत सदस्य पदाधिकारी उपस्थित होते. महिला दिन महिलांना मैदानात उतरवून त्यांच्या क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी केलेला प्रयत्न अतिशय स्तुत्य असून आज महिला सर्व क्षेत्रात आपले योगदान देत आहे, त्यांना प्रेरणा दिली त्याबद्दल सुलक्षणा सावंत यांनी डॉ. शेट्ये यांचे विशेष अभिनंदन केले.

यावेळी क्रीडा ज्योत प्रज्वलित करून त्यांनी उद्घाटन केले. डॉ. गीता काकोडे यांनी आज महिला सर्व क्षेत्रात पुढाकार घेत असून तिने स्वतः ची काळजी घेणे गरजेचे आहे. महिला सशक्त झाली तर समाज सशक्त राष्ट्र मजबूत होण्यास मदत होते.

महिलांनी क्रीडा क्षेत्रातही लौकिक प्राप्त केलेला असून आजचा क्रीडा मिळावा महिलांसाठी एक आदर्श उपक्रम असल्याचे डॉ. गीता काकोडे यांनी स्पष्ट केले.

आमदार चंद्रकांत शेट्ये यांनी स्वागत पर भाषणात महिलांना प्रोत्साहन देण्याचे हेतूने आगळावेगळा उपक्रम राबवला, त्याला सुमारे आठशे अधिक महिलाचा प्रतिसाद दिला त्याचे खूप समाधान असल्याचे स्पष्ट केले. यावेळी नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर यांनी महिला खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन राजन कडकडे व सायली गर्दे यांनी केले. तीन दिवस झालेल्या या महिला क्रीडा मेळाव्यात विविध स्पर्धा घेण्यात आल्या त्याला मोठा प्रतिसाद लावला.

फोंडा येथे कविवर्य कुसुमाग्रज यांच्या कवितांना उजाळा

■ टीम दैनिक हेराल्ड

नावेली, दि. ९ : कविवर्य कुसुमाग्रज यांनी साहित्यातील कथा, कादंबरी, नाटक, निबंध, असे सर्व प्रकारचे साहित्य उत्तम रितीने हाताळले, असे उद्गार डॉ. बिभिषण सातपुते यांनी फोंडा येथील राजदीप गॅलरिया येथे मराठी भाषा निमित्त आयोजित खास कार्यक्रमात अध्यक्षपदावरून बोलताना काढले. साहित्यलेणी प्रतिष्ठानतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मी जोग म्हणाल्या, मराठीतूनच बोलायची सवय लावा तरच नव्या पिढीला मराठीची सवय लागेल. डॉ. अनीता तिळवे यांनी कुसुमाग्रज व सावकार यांच्या जिवनकार्याची माहिती दिली. ज्येष्ठ कीर्तनकार सुहासबुवा वझे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. ज्येष्ठ नाट्यकर्मी नितिन कोलवेकर यांनी नटसम्राट मधील स्वगत सादर केले. विश्वनाथ जोशी यांनी कुसुमाग्रजांनी अनुवादीत केलेली मेघदूतातील काही श्लोक सादर केले.दया मित्रगोत्री, बिभीषण सातपुते, कविता आमोणकर, नूतन दाभोळकर, दीपा मिरिंगकार, अनंत काजरेकर , सचिन मणेरीकर, मंजिरी वाटवे, डॉ. अनीता तिळवे , महेश पारकर, माधुरी उसगावकर , वसुधा तारी, बबीता नार्वेकर, रेशम झारापकर , प्रकाश क्षीरसागर , श्रुती हजारे यांनी कुसुमाग्रजांच्या कविता सादर केल्या.

पाहिजेत

Wanted Counter sales boys and sales girls staying in and around Panjim, Pls. Contact Tel. Nos. 9011937381